(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठीत अनुवाद)

(२०१८) ६ एस. सी. आर. ६६२ - ६६६

डॉ. पंकज कुमुदचंद्र फडणीस

विरुद्ध

भारतीय संघराज्य , कायदा आणि न्याय मंत्रालय

(विशेष याचिका (दिवाणी) क्र. ८२९३/२०१८)

२८ मार्च, २०१८

[न्या. एस. ए. बोबडे आणि न्या. एल. नागेश्वर राव]

महात्मा गांधी हत्याकांड – रिट याचिकाकर्त्याची प्रकरणाची पुन्हा सुनावणी घेण्याची विनंती – महात्मा गांधींची हत्या सुमारे ७० वर्षांपूर्वी झाली – न्यायचौकशी न्यायालयाने ७ आरोपींना हत्या आणि कटाच्या गुन्ह्यात दोषी ठरवले आणि एकाला मुक्त केले – उच्च न्यायालयाने ५ आरोपींची शिक्षा कायम ठेवली आणि दोन आरोपींना मुक्त केले – सुमारे ७० वर्षांनी, नवीन शोधाच्या आधारावर उच्च न्यायालयात रिट याचिका – उच्च न्यायालयाने रिट याचिकेवर सुनावणी घेण्यास नकार दिला आणि दोन प्रश्नांवर चर्चा करण्यास नकार दिला , ते म्हणजेच तथाकथित चार गोळ्या मारण्यात आल्या आणि कपूर आयोगाच्या अहवालावर ४६

वर्षांच्या कालावधीनंतर उघडाला जाईल का – विशेष अनुमती याचिका – निर्णय दिला : फौजदारी प्रकरणे, ज्यात दोषसिद्धी झाली आहे आणि मृत्युदंडाची शिक्षा सुद्धा झाली आहे, तसेच ज्यांना जन्मठेप झाली त्यांचा मृत्यू झालेला आहे, त्यांचे पुनरावलोकन होऊ नये – याशिवाय, अशा पुनरावलोकनासाठी कायद्यात कोणतीही तरतूद नाही – एका दीर्घकाळपूर्वी संपलेल्या प्रकरणात नवीन शोध हा फौजदारी तपास पुन्हा सुरु करण्यासाठी न्याय्य ठरणार नाही – याचिकाकर्त्याचा या वादाला पुन्हा चालू करण्याचा प्रयत्न व्यर्थ आहे – न्यायालयाला अशा विवादास्पद मुद्द्यांबद्दल सावध रहावे लागेल आणि त्याच्या अधिकारितेचा वापर अशा कारणांसाठी करण्यास नकार द्यावा लागेल – विशेष अनुमती याचिका फेटाळली – फौजदारी तपास.

राम किशन दालमिया विरुद्ध न्यायमूर्ती एस. आर. तेंडोलकर

[१९५९] एस. सी. आर. २७९ : ए. आय. आर. १९५८ एस. सी. ५३८ – येथे संदर्भित

<u>निर्णय विधींचा संदर्भ</u>

[१९५९] एस. सी. आर. २७९ परिच्छेद ७ चा संदर्भ दिला

दिवाणी अपीलीय अधिकारिता : विशेष अनुमती याचिका (दिवाणी) क्र. ८२९३/२०१८.

मुंबई उच्च न्यायालयाच्या पी आय एल क्र. ३२/ २०१६ मधील दिनांक ०६.०६.२०१६ च्या न्यायनिर्णय व आदेशावरून.

पक्षकारांसाठी उपस्थिती, ए. शरण, वरिष्ठ वकील (ए सी), संचित गुरु, श्रीमती गरिमा बोस, श्रीमती अपराजिता मुखर्जी, समर्थ खन्ना, वकील,

डॉ. पंकज कुमुदचंद्र फडणिस, याचिकाकर्ता स्वतः जातीने उपस्थित.

न्या. एस. ए. बोबडे आणि न्या. एल. नागेश्वर राव यांनी न्यायालयाचा आदेश दिला.

<u>आदेश</u>

१. महात्मा गांधींची हत्या दिनांक ३०.१.१९४८ रोजी झाली ; म्हणजेच सुमारे ७० वर्षांपूर्वी. गांधीजींच्या हत्येचा कट आणि हत्या प्रकरणी ९ आरोपींवर खटला चालवला गेला होता. न्यायचौकशीनंतर, माननीय विशेष न्यायाधीश, दिल्ली यांनी दिनांक १०.०२.१९४९ रोजी न्यायनिर्णय दिला, ज्यामध्ये सात आरोपींना दोषी ठरवले आणि एका आरोपीला मुक्त केले. आरोपी नाथूराम गोडसे आणि नारायण आपटे यांना मृत्युदंडाची शिक्षा देण्यात आली , तर चार आरोपींना जन्मठेप आणि उर्वरित एका आरोपीला सात वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. या शिक्षेविरुद्ध पंजाब उच्च न्यायालयात अपील दाखल करण्यात आले होते, उच्च न्यायालयाने दिनांक २१.०६.१९४९ रोजीच्या न्याय निर्णयाद्वारे पाच आरोपींची शिक्षा कायम ठेवली आणि दोन आरोपींना मुक्त केले. आज कोणताही आरोपी जिवंत नाही.

२. वादी, जो स्वतःला "एक इंजिनियर, व्यवस्थापन पदवीच्युत, पी. एचडी आणि संशोधनाचे आवड असलेला " म्हणून वर्णन करतो, २०१६ मध्ये याने उच्च न्यायालयात एक रिट याचिका[1] दाखल केली. उच्च न्यायालयाने याचिका स्वीकारण्यास नकार दिला आणि दोन प्रश्नांची तपासणी करण्यास नकार दिला: (१) तथाकथित चार गोळ्या मारल्या गेल्या का? आणि (२) कपूर आयोगाचा अहवाल हा ४६ वर्षांच्या कालावधीनंतर पुन्हा उघडाला पाहिजे का?

३. याचिकाकर्त्याने हा मुद्दा उपस्थित करण्यासाठी केलेला विलंब खूपच जास्त आहे. याचिकाकर्त्याच्या मते, गांधीजींची हत्या कोणत्या परिस्थितीत झाली याबद्दल काही शोध घेतल्यानंतर आणि या हत्येत एका अदृश्य हाताचा सहभाग असल्याची खात्री पटल्यानंतर त्यांनी न्यायालयात धाव घेतली. तथापि, आम्हाला असे वाटत नाही की भूतकाळातील निष्कर्षाप्रत असलेल्या प्रकरणातील नवीन शोध हा फौजदारी तपास पुन्हा सुरू करण्यास समर्थन देतो किंवा असे काहीही सांगितले जाऊ शकते जे अशा प्रकरणाची पुन्हा सुरुवात करण्यास परवानगी देऊ शकते. फौजदारी प्रकरणे, ज्यात दोषसिद्धी झाली आहे आणि मृत्युदंडाची शिक्षा सुद्धा झाली आहे, तसेच ज्यांना जन्मठेप झाली त्यांचा मृत्यू झालेला आहे, त्यांचे पुनरावलोकन होऊ नये तसेच अशा पुनरावलोकनासाठी कायद्यात कोणतीही तरतूद नाही परंतु, आमच्यासमोर असा युक्तिवाद करण्यात आले की गांधीजींची हत्या ही जागतिक स्तरावर परिणामकारक घटना होती आणि राष्ट्राला सत्य जाणण्याचा अधिकार

1पी. आय. एल. क्रमांक ३२/ २०१६

आहे. निःसंशयपणे, राष्ट्राला सत्य जाणण्याचा अधिकार आहे, परंतु जेव्हा सत्य आधीच स्पष्ट आहे परंतु जेव्हा काही शैक्षणिक संशोधन कायद्यात वेगळा दृष्टिकोन मांडतात तेव्हा सत्य आधीच सर्वज्ञात असते तेव्हा अशा अधिकाराचा वापर केला जाऊ शकत नाही. हे ऐकीव माहितीच्या आधारावर मुद्दे पुन्हा उघडण्या समान होईल.

४. आम्हाला हे निरीक्षण करण्यास भाग पाडले जाते कारण नाथूराम गोडसेला त्या पुराव्यावर दोषी ठरवण्यात आले जे प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांनी दिले होते, जे प्रार्थना सभेत उपस्थित होते. त्या सभेला अनेक लोक उपस्थित होते. प्रत्येक प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराने वर्णन केले की गोडसे कसे पुढे गेला आणि गांधीजींवर गोळ्या झाडल्या. सर्व पुरावे दर्शवतात की तीन गोळ्यानी शरीरात घुसल्या. याशिवाय पुढील माहिती सुद्धा समोर आली की :

(i) हल्ल्याचे शस्त्र अर्ध-स्वयंचलित बेरेटा पिस्तूल होते ज्यामध्ये एका वेळी सात काडतुसे वाहून नेऊ शकत होती. वादीचे साक्षीदार (पी. डब्लू) - ३१ यांच्याकडून चार जिवंत काडतुसांसह पिस्तूल जप्त करण्यात आले होते.

(ii) घटनेच्या ठिकाणी दोन रिकामे काडतुसे सापडली; तिसरे गांधीजींच्या पार्थिवाला शेवटचे विधीवत स्नान घालण्यात आले तेव्हा शालमध्ये सापडले.

(iii) मृत्यू अहवालात तीन गोळींच्या जखमांचा उल्लेख आहे :

(ए) छातीच्या उजव्या बाजूला निप्पलच्या जवळ एक जखम.

(बी) छातीच्या खाली उजव्या बाजूला एक जखम.

(सी) पोटाच्या उजव्या बाजूला एक जखम.

दोन जखमा ह्या गोळी बाहेर पडण्याच्या होत्या, एक गोळी शरीरातून बाहेर गेली नाही. त्यामुळे, घटना घडली त्या ठिकाणी फक्त दोन गोळ्या पडलेल्या आढळल्या. चौथी झाडलेली गोळी किंवा रिकामी काडतूस घटना घडली त्या ठिकाणी सापडले नाहीत.

५. पोलिसांच्या प्रथम खबर अहवालामध्ये संध्याकाळी ५:४५ वाजता तीन गोळ्या झाडल्याचा उल्लेख आहे. लेफ्ट. कर्नल तनेजा यांनी तयार केलेल्या मरणान्वेषण अहवालात गांधीजी यांना फक्त तीन गोळ्यांमुळे जखम झाली असल्याचे दाखवले आहे. सहा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार होते ; पी. डब्लू - ३१ (अमर नाथ), पी. डब्लू - ३२ (नंदलाल मेहता), पी. डब्लू - ३४ (रतन सिंग), पी. डब्लू - ३७ (धरम सिंग), पी. डब्लू - ७६ (रघुनाथ नाईक), पी. डब्लू - ८२ (सरदार गुर्बचन सिंग). प्रत्येकाने सांगितले की, नथुराम गोडसे याने एकट्यानेच तीन गोळ्या झाडल्या. कोणत्याही पक्षकारांच्या वतीने, म्हणजेच, फिर्यादी किंवा बचाव पक्षाने असे सुचवले नाही की चार गोळ्या झाडल्या गेल्या किंवा दुसरा हल्लेखोर होता. विद्वान न्यायमित्र श्री अमरेंद्र शरण, ज्येष्ठ वकील यांच्या सादर केलेल्या अहवालात या संदर्भातील सर्व संबंधित पुराव्यांचा तपशीलवार उल्लेख आहे.

६. याचिकाकर्त्याने या न्यायालयात आणखी एक म्हणणे सादर केले आहे की, या न्यायालयाने कपूर आयोगाच्या निष्कर्षांचे पुनरावलोकन करणे आवश्यक आहे. लोकमान्य बाळगंगाधर टिळक यांचे नातू जी.व्ही. केतकर यांनी महात्मा गांधींच्या खुनाच्या कटाबद्दल घटनेपूर्वीच माहिती असल्याचा दावा केला. यामुळे एक राजकीय वाद निर्माण झाला आणि महात्मा गांधींच्या खुनाच्या कटाच्या चौकशीसाठी कपूर आयोग स्थापन करण्यात आला. या न्यायालयाचे माजी न्यायाधीश श्री. जीवनलाल कपूर यांच्या नेतृत्वाखाली आयोगाने सन १९६९ मध्ये आपला अहवाल सादर केला. याचिकाकर्त्याच्या मते, कपूर आयोगाच्या अहवालातील खालील निष्कर्ष अनुचित आहेत कारण यामुळे श्री सावरकर यांच्या अनुयायांच्या भावना दुखावल्या जातात :-

" या सर्व तथ्यांचा एकत्र विचार केल्यास सावरकर आणि त्यांच्या गटाच्या हत्येच्या कटा शिवाय इतर कोणत्याही सिद्धांताचे अस्तित्व नष्ट झाले. "[2]

म्हणून, त्यांनी या निष्कर्षाचे पुनरावलोकन किंवा नवीन आयोग स्थापनेची मागणी केली.

७. विद्वान न्यायमित्राने सुचवले की, हा निष्कर्ष श्री. सावरकर यांच्या मृत्यूनंतर दिला गेला आणि श्री. सावरकर किंवा त्यांच्या कोणत्याही प्रतिनिधींना संधी देण्यात आली नव्हती. त्यांनी असे सादर केले की, हा निष्कर्ष उचित नाही कारण श्री. सावरकर यांची खटल्यात निर्दोष मुक्तता करण्यात आली होती. यात शंका नाही की, हा निष्कर्ष निर्दोष मुक्ततेवर कोणताही परिणाम करत

2 कपूर अयोग्य अहवाल, खंड २ चे पान क्रमांक ३०३

नाही आणि हे एक सामान्य निरीक्षण आहे, कदाचित तेव्हा केलेले जेव्हा गोडसे आणि इतर हे श्री. सावरकर यांच्याशी संबंधित आढळले होते. हा निष्कर्ष श्री. सावरकर यांना निर्दोष ठरवणाऱ्या फौजदारी न्यायालयाच्या निष्कर्षाचा परिणाम उलथवून टाकू शकत नाही. या न्यायालयाच्या घटना पीठाने राम किशन दालमिया विरुद्ध न्यायमूर्ती एस .आर. तेंडोलकर[3] या प्रकरणातील आयोगाच्या निष्कर्षांचा परिणाम खालीलप्रमाणे विचारात घेतला : -

" आयोगाला अभिनिर्णय देण्याचा अधिकार नाही जो स्वतःच्या सामर्थ्यावर लागू केला जाऊ शकतो."

पुढे, घटनापीठाने चौकशी आयोगाच्या अहवालातील निष्कर्षांवर अहवालातील निष्कर्षांवर कारवाई करण्यास नकार दिला ;

"पण चौकशी आयोगाला न्यायिक अधिकार नसल्यामुळे आणि त्याचा अहवाल केवळ शिफारस करणारा असेल, जो स्वतःच्या सामर्थ्यावर प्रभावी असणार नाही, तसेच चौकशी आयोगासमोर कोणत्याही व्यक्तीने केलेले विधान, अधिनियमाच्या कलम ६ नुसार, भविष्यकाळातील कोणत्याही कारवाईत, दिवाणी किंवा फौजदारी, पुराव्यात पूर्णपणे स्वीकारार्ह नाही , त्यामुळे चौकशी आयोग "भरपाई किंवा शिक्षा मिळवण्याच्या मार्गाने" कारवाई करण्यासाठी शिफारसी करू शकतो, तेही, उच्च न्यायालयाच्या सहमतीने, आम्हाला वाटते की, या संदर्भात, हे आधीच केलेल्या चुकांना संदर्भ देते, अशा चुकांसाठी, जर काही असतील तर, योग्यरित्या स्थापन

३१९५९ एस. सी. आर. २७९ : ए. आय. आर १९५८ एस. सी. ५३८

केलेल्या न्यायालयाने ते खटल्यातील तथ्ये आणि परिस्थितींवर स्वतःच्या स्वेच्छधिकाराचा वापर करून आणि कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेच्या दृष्टिकोनाने प्रभावित न होता, ते कितीही आदरयुक्त किंवा उच्च अधिकार असले तरी, लादले पाहिजे ."

गांधीजींच्या हत्येसाठी श्री. सावरकरांना दोषी ठरवण्यात आले आहे हे याचिकाकर्त्याचे म्हणणे चुकीचे आहे.

८. तथापि, आम्ही या अहवालातील निष्कर्षांच्या बरोबर किंवा सचोटीवर चर्चा करण्यास उत्सुक नाही. हे एक नवीन वादाचे कारण बनण्याचे काम करील आणि त्यामुळे नवे वादळ उठेल. न्यायालयाला अशा विवादास्पद मुद्द्यांबद्दल सावध रहावे लागेल आणि त्याच्या अधिकारितेचा वापर अशा कारणांसाठी करण्यास नकार द्यावा लागेल.

९. म्हणून, आम्ही याचिकाकर्त्याने सादर केलेल्या चौथ्या गोळीच्या सिद्धांताला मान्यता देण्यास तयार नाही. न्यायमित्राने स्पष्टपणे नमूद केले की संग्रहालयातील मूळ छायाचित्राचे पुनरावलोकन केल्यास असा कोणताही निष्कर्ष नाही. याचिकाकर्त्याने हा वाद पुन्हा सुरु करण्याचा प्रयत्न आम्ही निरर्थक मानतो. कारण छायाचित्र घेतलेल्या व्यक्तीची तपासणी करता येणार नाही आणि या टप्प्यावर कोणत्याही तज्ञाने दिलेले छायाचित्रा विषयीचा जबाब हा स्वीकारार्ह असणार नाही.

१०. न्यायालय श्री अमरेंद्र शरण, विद्वान न्यायमित्र यांचे आभारी आहे, ज्यांनी न्यायालयाच्या मदतीसाठी खटल्याच्या संपूर्ण नोंदी आणि राष्ट्रीय संग्रहालयातील निशाणी या सर्वांची परिश्रमपूर्वक तपासणी केली आहे.

११. आम्हाला या विशेष अनुमती अर्जात कोणतीही गुणवत्ता आढळून येत नाही आणि त्यामुळे आम्ही याद्वारे तो फेटाळतो.

अंकित ग्यान याचिका फेटाळली

- x - x - x - x - x - x – x -

<u>अस्वीकरण</u>

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

- x - x - x - x - x - x - x – x -